अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :– बुधाजी नारायण आईर, वय :– ४० वर्षे,

धंदा :– नोकरी, राहणार :– कोरगाव, पेडणे, गोवा.

**सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु –**

मला घर दुरुस्तीसाठी व मोपा एअरपोर्टमध्ये टॅक्सी व्यवसायाकरीता कर्जाची गरज होती. म्हणुन मी शोधाशोध करत होतो. म्हणुन मी माझा मीत्र विठ्ठल पिळणकर सोबत बोलता बोलता मला कर्जाच्या रक्कमेची गरज असल्याबाबत सांगितले होते. त्यावर त्याने मला सांगितले की, समीक्षा ठाकुर ही दिशा फायनान्स मार्फत कर्ज मिळवुन देते. त्यावरुन मी त्याच्याकडुन समीक्षा ठाकुरचा फोन नंबर प्राप्त करुन तिला संपर्क साधला व तीने मला ती अर्थ ग्रुप दिशा फायनान्स मार्फत कर्ज पुरवु शकते असे कळविले. तिने मला सांगितले की, ३ टक्के दराने कर्ज मिळु शकते व प्रती १,००,०००/– रुपयांवर ८५००/– रुपये प्रोसेसींग फी म्हणुन लागते. म्हणुन मी माझ्या मीत्रासोबत तिच्या घरी गेलो व तेव्हा तिने मला कर्जाकरीता माझे आधारकार्ड, पॅनकार्ड, सहा महिन्यांचे बँक स्टेटमेंट, तीन फोटो इत्यादी कागदपत्रांची गरज असल्याबाबत कळविले. तसेच तिने मला कळविले की, त्यांचे कार्यालय मुंबईत असुन लवकरच गोवा येथे कार्यालय सुरु होणार आहे व सध्या ती ऑनलाईन पद्धतीने काम करत आहे. तसेच तिने मला कळविले की, लवकरात लवकर लोन हवे असल्यास लवकरात लवकर कागदपत्र व पैसे पुरवावे

लागतील. मला एकुण २०,००,०००/– रुपयांच्या कर्जाची गरज असल्याने तीने मला १,७०,०००/– रुपये प्रोसेसींग फी म्हणुन भरावी लागणार असल्याचे सांगितले. मी दुसऱ्या दिवशी तिला चांदेल येथे बोलवीले व पे.टी.एम ने रक्कम रु.१,००,०००/– भरले व उर्वरीत रक्कम रु. ७०,०००/– मी तीला रोख स्वरुपात दिले. मला तिने १,७०,०००/– रुपयांची दिलेली पावती, पे.टी.एम. चे स्क्रीनशॉर्ट व बँक स्टेटमेंट पुरविले आहेत. त्यानंतर तीने मला सांगितले की, मी लवकरात लवकर तुमचे कर्ज क्रिअर करते. काही दिवस झाल्यानंतर मी पुन्हा तिला संपर्क साधला असता मला तिने थोडासा वेळ अजुन लागणार असल्याचे कळविले. त्यानंतर मला तिने कळविले की, मी भरलेले पैसे यश परब मुंबईच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याना आपले कमीशन काढुन ट्रान्सफर केले असल्याचे तिने मला कळविले. तरी देखील अनेक दिवस गेल्यानंतर मला समजले की, माझ्या सारख्या अनेक लोकांकडुन पैसे घेतले गेलेले आहेत व फसवणुक केली आहे. म्हणुन मी पोलीस स्टेशनमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. मी पोलीसांना १३ मे २०२३ रोजी जबाब दिला. समीक्षा ठाकुर हिला पाहिल्यास मी ओळखु शकतो. ती आज रोजी न्यायालयात हजर आहे. मला दिलेली पावती पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी न्यायालयाच्या अभिलेखावर पावतीची कॉपी दिसुन येत आहे. तसेच बँक स्टेटमेंटच्या प्रती मी हजर केलेल्या आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस्. ए. गवस यांचेकडून सुरु –**

२) माझ बी.एस.सी. पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, मी गोवा येथे राहण्यास आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे पैशांची जी देवाण–घेवाण झाली ती गोवा येथे झाली. हे म्हणणे बरोबर आहे की, गोवा येथे आजतागायत मी कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी फसवणुक झाल्याबाबत मी कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविलेली नाही. मी दोडामार्ग पोलीस स्टेशनमध्ये १३ तारखेला तक्रार नोंदविली. ती तक्रार आज रोजी पोलीस स्टेशनमध्ये असणार. त्या तक्रारीला पडलेला गुन्हा रजि. क्र. मला सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या टिपणा व्यतिरीक्त मी इतर कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, या टिपणालाच मी माझी तक्रार म्हणत आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, या टिपणावर माझी कोठेही सही नाही.

३) हे म्हणणे बरोबर आहे की, समीक्षा हिला मी वैयक्तीक ओळखत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मी तिचे आधारकार्ड किंवा इतर ओळखपत्र पाहुन ती समीक्षा असल्याचे खात्री केलेली नाही.

प्रश्न – तुम्ही सांगत असलेली प्रोसेसींग फी तुम्ही अर्थग्रुप आणि दिशा फायनान्स यांच्यासाठी दिलेली होती ?

उत्तर– तिने स्वतः जबाबदारी घेऊन दिशा फायनान्सला देणार असे सांगितले होते.

४) तसे मी पोलीसांना टिपण देतेवेळेस सांगितले होते. परंतु, तसे माझ्या टिपणामध्ये माझे नमुद नाही व ते का नमुद नाही याचे कारण मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तीने स्वतः जबाबदारी घेऊन ते पैसे पुढे देणार असे मला कधीही सांगितले नव्हते व त्याचमुळे तसे मी कधीही पोलीसांना सांगितले नाही व त्याचमुळे तसे माझ्या टिपणामध्ये नमुद नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, समीक्षा हिने आपले स्वतःचे नाव लिहुन त्याखाली सही करुन मला पावती दिलेली नव्हती. हे म्हणणे बरोबर आहे की, मी आज पर्यंत दिशा फायनान्स व अर्थ ग्रुप या संस्था अस्थित्वात असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा पाहिलेला नाही.

प्रश्न – दिशा फायनान्स व अर्थ ग्रुप यांच्याशी समीक्षा हिचा संबंध असल्याचा दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा तुमच्या कडे नाही ?

उत्तर– मला दिलेली पावती सोडुन इतर कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

५) हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या जवळ असलेल्या पावतीवर समीक्षा ठाकुर या नावाचा उल्लेख कोठेही नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, माझी पावती मी याकामी पोलीसांना चौकशी दरम्यान दिलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, अर्थ ग्रुप व दिशा फायनान्स अशा कंपन्या अस्थित्वात आहे किंवा कसे तसेच त्यांचे व्यवस्थापक कोण याबाबत मी वैयक्तीक चौकशी केलेली नाही.

६) मी माझ्या आयुष्यात वैयक्तीकरीत्या बँकेकडुन कर्ज घेतलेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, बँकेकडुन कर्ज घेताना आपला आयकर परतावा, उत्पन्नाचे

दाखले, तारण मालमत्ता इ. गोष्टी पुरवाव्या लागतात. हे म्हणणे बरोबर आहे की, अशा गोष्टी नसल्यास बँका कर्ज देत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, बँकेच्या कर्जाकरीता प्रोसेसींग फी घेतली जात नाही.

७) हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला कधीही कोणत्याही प्रकारचे पैसे दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपी कडुन कधीही कोणतीही फसवणुक झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचा तथाकथीत व्यवहार गोव्यात झाला असल्याने मला दोडामार्गमध्ये तक्रार दाखल करण्याचा अधिकार नाही.

८) हे म्हणणे खरे नाही की, मला घर दुरुस्तीसाठी व मोपा एअरपोर्टमध्ये टॅक्सी व्यवसायाकरीता कर्जाची गरज होती म्हणुन मी शोधाशोध करत असताना माझा मीत्र विठ्ठल पिळणकर सोबत बोलता–बोलता मला कर्जाच्या रक्कमेची गरज असल्याबाबत सांगितले असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर त्याने मला सांगितले की, समीक्षा ठाकुर ही दिशा फायनान्स मार्फत कर्ज मिळवुन देते व त्यावरुन मी त्याच्याकडुन समीक्षा ठाकुरचा फोन नंबर प्राप्त करुन तिला संपर्क साधला व तीने मला ती अर्थ ग्रुप दिशा फायनान्स मार्फत कर्ज पुरवु शकते असे कळविल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिने मला सांगितले की, ३ टक्के दराने कर्ज मिळु शकते व प्रती १,००,०००/– रुपयांवर ८५००/– रुपये प्रोसेसींग फी म्हणुन लागते आणि म्हणुन मी माझ्या मीत्रासोबत

तिच्या घरी गेलो व तेव्हा तिने मला कर्जाकरीता माझे आधारकार्ड, पॅनकार्ड, सहा महिन्यांचे बँक स्टेटमेंट, तीन फोटो इत्यादी कागदपत्रांची गरज असल्याबाबत कळविल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच तिने मला कळविले की, त्यांचे कार्यालय मुंबईत असुन लवकरच गोवा येथे कार्यालय सुरु होणार आहे व सध्या ती ऑनलाईन पद्धतीने काम करत आहे, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच तिने मला कळविले की, लवकरात लवकर लोन हवे असल्यास लवकरात लवकर कागदपत्र व पैसे पुरवावे लागतील, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला एकुण २०,००,०००/- रुपयांच्या कर्जाची गरज असल्याने तीने मला १,७०,०००/- रुपये प्रोसेसींग फी म्हणुन भरावी लागणार असल्याचे सांगितले आणि त्याकरीता मी दुसऱ्या दिवशी तिला चांदेल येथे बोलवीले व पे.टी.एम ने रक्कम रु.१,००,०००/- भरले व उर्वरीत रक्कम रु. ७०,०००/- मी तीला रोख स्वरुपात दिल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला तिने १,७०,०००/- रुपयांची दिलेली पावती, पे.टी.एम. चे स्क्रीनशॉर्ट व बँक स्टेटमेंट पुरविले आहेत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर तीने मला सांगितले की, मी लवकरात लवकर तुमचे कर्ज क्रिअर करते व काही दिवस झाल्यानंतर मी पुन्हा तिला संपर्क साधला असता मला तिने थोडासा वेळ अजुन लागणार असल्याचे कळविल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मला तिने कळविले की, मी भरलेले पैसे यश परब मुंबईच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याना आपले कमीशन काढुन ट्रान्सफर केले व तरी देखील

अनेक दिवस गेल्यानंतर मला समजले की, माझ्या सारख्या अनेक लोकांकडुन पैसे घेतले गेलेले आहेत व फसवणुक केली आहे, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, म्हणुन मी पोलीसांना १३ मे २०२३ रोजी जबाब दिल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, समीक्षा ठाकुर हिला मी न्यायकक्षात ओळखलेबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयाच्या अभिलेखावर पावतीची कॉपी दिसुन येत असल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बँक स्टेटमेंटच्या प्रती मी हजर केल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फसवणुकीशी आरोपीचा कोणताही कसलाही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाणः– दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांकः– ०७/०४/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग.